पीएनपी महाविद्यालयात मराठी राजभाषा गौरव दिवस उत्साहात साजरा ....

प्रभाकर पाटील एज्युकेशन सोसायटीच्या कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील मराठी वांग्मयमंडळातर्फे २७ फेब्रुवारी मराठी भाषा गौरव दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी मराठी विभागातील विद्यार्थ्यांनी भीत्तीपत्रकाद्वारे मराठी भाषेतील विविध लेख संकलित करून त्याचे कोलाज केले संस्थेचे विशेष कार्यकारी अधिकारी मा.मिर्झी सर यांच्या उपस्थितीत महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. ओमकार पोटे यांच्या हस्ते फित कापून भीत्ती पत्रकाचे उद्घाटन करण्यात आले.

तृतीय वर्ष मराठी विभागातील विद्यार्थी कु. तेजस पाटील यांनी मराठी भाषेबद्दल आपले मनोगत व्यक्त करून उपस्थितांची मने जिंकली सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी विभागप्रमुख प्रा. नम्रता पाटील मॅडम यांनी केले आपल्या अध्यक्षीय वक्तव्यात डॉ .ओमकार पोटे यांनी मराठी साहित्यातील विज्ञान साहित्यावर भाष्य केले तर मा. मिर्झी सर यांनी केवळ एक दिवस मराठी भाषा दिन साजरा करून उपयोग नाही तर रोजच मराठी भाषा दिवस साजरा व्हायला पाहिजे त्यासाठी विद्यार्थ्यांनी व प्राध्यापकांनी प्रयत्न करणे आवश्यक आहे असे आपले मत मांडले सदर कार्यक्रमास महाविद्यालयातील विद्यार्थी विज्ञान विभाग प्रमुख रवींद्र पाटील सर, वाणिज्य विभाग प्रमुख डॉ .रसीका म्हात्रे मॅडम व निकिता पाटील मॅडम, इतर प्राध्यापक वृंद उपस्थित राहिले.






प्रभाकर पाटील एज्युकेशन सोसायटीचे
कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय
राजभाषा
दिन
DAY
Feb. 2022



